"महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व वृद्ध कलावंतांना मानधन", या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थ-सहाय्यात वाढ करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एमव्हीएम-१९९३/२२८०९/प्र.क्र. २७९/सांकार्य-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४००.०३२.

दिनांक: २ जून १९९४.

वाचा:-
१) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. डीटीडब्ल्यू-१२६५/एन, दिनांक ११ ऑगस्ट, १९६५.
२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एमव्हीएम-१०९०/प्र.क्र. ३००/सां.का.-१, दिनांक १६ मार्च, १९९१.
३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एमव्हीएम-१०९१/५५२५७/प्र.क्र. ४४६/सां.का. १, दिनांक १८ जून, ९२.
४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एमव्हीएम-१०९१/५५२५७/प्र.क्र. ४४६/सां.का. १, दि. ८ ऑक्टोबर, ९२.
५) सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक: साकास/मानधन/१०९३/६४४५, दिनांक २८ जून, १९९३.

शासन निर्णय:- "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर, वृद्ध साहित्यिक व वृद्ध कलाकारांना मानधन" या योजनेअंतर्गत शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एमव्हीएम-१०९०/प्र.क्र. ३००/सां.का.-१, दि. १६ मार्च, १९९१ च्या परिशिष्ट "अ" मधील नियम क्र. ५ अन्वये कलाकारांच्या दर्जानुसार त्यांची "अ" "ब" व "क" वर्गात वर्गवारी करण्यात येऊन त्या वर्गवारीनुसार त्याच परिशिष्टातील नियमांच्या आधारे मानधन दिले जात आहे. या मानधनात वाढ करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. विचारांती शासन, या शासन निर्णयान्वये सध्या देण्यात येणाऱ्या "अ" वर्गास रु.५००/- दरमहा (रु.६००० वार्षिक) "ब" वर्गास रु.४००/- दरमहा (वार्षिक रु.४८००) व "क" वर्गास रु.३००/- दरमहा (वार्षिक रु.३,६००) या मानधनामध्ये सरसकट रु.२००/- दरमहा याप्रमाणे वाढ करण्यास मंजुरी देत आहे. यानुसार सुधारीत मानधन "अ" वर्गासाठी रु.७००/- दरमहा (वार्षिक रु.८,४००/-) "ब" वर्गासाठी रु.६००/- दरमहा (वार्षिक रु.७,२००/-) व "क" वर्गासाठी रु.५००/- दरमहा (वार्षिक रु.६,०००) राहील. हे सुधारीत मानधन सन १९९४-९५ पासून मंजूर करण्यात येईल. या योजनेच्या नियमावलीतील नियम क्र.४(ड) नुसार कलाकार व साहित्यिक व कलाकार व साहित्यिक यांच्या विधवा पत्नींना यांना हयातीत मानधन त्यांच्या

हयातीपर्यंत मंजूर करण्यात येत असल्यामुळे सन, १९९३-९४ या आर्थिक वर्षापर्यंत ज्या कलाकारांना या योजनेचा लाभ मिळत आहे, त्यांनाही या सुधारीत मानधनाचा लाभ १९९४-९५ या आर्थिक वर्षापासून मिळेल.

२. यासाठी येणारा खर्च "२२०५-कला व संस्कृती-(८००) इतर खर्च [२०] (२) साहाय्य, कला इ. क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना वित्तीय सहाय्य (२२०५ ०८५२) मागणी क्र. एन-३" या लेखाशीर्षांतर्गत खर्ची टाकण्यात येऊन त्या अंतर्गत चालू आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध तरतूदीतून व त्यानंतरच्या पुढील वर्षामध्ये करण्यात येणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी या योजनेसाठी नियुक्त केलेल्या उच्च स्तरीय समितीने मान्यता दिल्याप्रमाणे कलाकारांना अर्थसहाय्य अदा करण्याची पुढील कार्यवाही करावी.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौ. संदर्भ क्र. ७१८/९४/व्यय-११, दिनांक ५.५.९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

उल्का पाटील

[ उल्का पाटील ]
कार्यासन अधिकारी.

प्रत :-
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व जिल्हाधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा).
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय, मुंबई.
विभाग (अर्थसंकल्प-३, अर्थसंकल्प-५), मंत्रालय, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागार संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला,
नस्ती, का-सां.का.१